ePaper


# राज ठाकरेंवर बोलताना वकील जयश्री पाटील यांची जीभ घसरली

वर्ष - 8 । अंक - 355 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™





## आतील पानांत

- सिराजच्या सापळ्यात क्राऊले अडकला!
- ओव्हल कसोटी जिंकणं सोपं नाही!
- निवडणुकांमध्येही गैरप्रकाराचा आरोप
- पत्नीने पतीला संपविण्याचा घाट घातला


www.mahaenews.com । रविवार, दि. 3ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**अमेरिका-रशिया वाद** जागतिक तेल पुरवठ्यावर जबरदस्त परिणाम

# पेट्रोल, डिझेलचे दर भडकणार!

## देशा-देशातील तणावामुळे बिकट परिस्थिती : तज्ज्ञांच्या मते क्रूड ऑईलच्या दरात वाढ होण्याची शक्यता

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**संपूर्ण जगामध्ये अनेक ठिकाणी युद्धजन्य परिस्थिती असून तणाव आहे. त्यामध्ये भारत-पाकिस्तान, इस्राईल-इराण, रशिया-युक्रेन यांच्यातील संघर्ष आणि त्यामध्ये अमेरिकेचा होणारा हस्तक्षेप पाहता सध्या इंधन क्षेत्रात मोठा पेच निर्माण झाला असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरामध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.**

### अमेरिका-रशिया वादाचा फटका

अमेरिकेने विविध देशांवर लावलेले कर, त्यांनी रशियाला दिलेले इशारे यामुळे सर्वच क्षेत्रात तणाव निर्माण झाला असून जागतिक तेल पुरवठ्यावर जबरदस्त परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे देशा-देशांतील तणावामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली असून इंधन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते क्रूड ऑईलच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम म्हणून सर्वत्र पेट्रोल आणि डिझेलच्या किमती भडकण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.





### तेलाच्या पुरवठ्यात अडथळे..

अनेक राजकीय घटना विचित्र पद्धतीने घडत असून रशिया आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असल्याचे चित्र आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढल्याने तेलाच्या जागतिक पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ शकतात. ऑईल मार्केट एक्सपर्टसनी 'एएनआय' शी संवाद साधताना स्पष्टपणे म्हटले आहे, की येत्या काही महिन्यांमध्ये 'ब्रेंट क्रूड ऑईल' च्या दरात वाढ होऊन ते ८० डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचू शकतात. भू-राजकीय जोखीम वाढल्याने तेलाच्या दरांवर दबाव वाढू शकतो, असेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### इंधन तज्ज्ञांचे म्हणणे

वेंचुरामधील 'कमोडिटीज आणि सीआरएम' चे प्रमुख एन. एस. रामास्वामी यांनी म्हटले आहे, की ब्रेंट ऑईलचे दर ऑक्टोबर दरम्यान ७२.०७ डॉलरवरुन ७६ डॉलर्स वर पोहचू शकतात. २०२५ च्या शेवटी हे दर ८०-८२ डॉलर्सपर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे.

### महागाईचा आगडोंब उसळू शकतो..!

**इंधन म्हणजेच डिझेल, पेट्रोल महागले तर साहजिकपणे सर्वच वस्तू महागण्याची शक्यता असते. इंधन महागल्यामुळे साहजिकच वाहतूक महागते, म्हणजेच अन्नधान्य, भाजीपाला आणि जीवनावश्यक वस्तूंची टंचाई होऊ शकते आणि दर वाढू शकतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घातलेल्या अटींपुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी आता काय मार्ग काढतात? याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.**

### युद्ध थांबण्यासाठी मुदत

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला युक्रेन सोबतचे युद्ध थांबवण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा वेळ दिला आहे. जर रशियाने युद्ध थांबवले नाही, तर रशियासोबत व्यापार करणाऱ्या देशांवर अमेरिका अतिरिक्त निर्बंध लादणार असून शंभर टक्के दुय्यम टॅरिफ लादणार असल्याचा इशारा दिला आहे. हे उद्गार पाहता तज्ज्ञांच्या मते, त्यामुळे तेलाच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

### टॅरिफ विरोधात लढा

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे रशियाकडून क्रूड ऑईल खरेदी करणाऱ्या देशांसमोर अडचणी निर्माण होऊ शकतात. कमी दराने कच्चे तेल खरेदी करावे, अमेरिकेकडून लादल्या जाणाऱ्या मोठ्या दंडाचा आणि टॅरिफचा सामना करायचा असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. 'वेस्ट टेक्सास इंटरमिजीएट' ने सप्टेंबरमध्ये क्रूड ऑईलचा दर ६९. ६५ डॉलर्स वरुन ७३ डॉलर्सपर्यंत पोहचू शकतात, असा अंदाज वर्तवला जात आहे.

### तेल बाजारात उलटफेर..

यावर्षी २०२५ च्या अखेरपर्यंत ७६-७९ डॉलर्स पर्यंत कच्च्या तेलाचे दर पोहचू शकतात. क्रूड ऑईलचे दर कमी झाल्यास ते ६५ डॉलर्स पर्यंत येऊ शकतात. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार या घडामोडींमुळे जागतिक तेल बाजारात उलटफेर होऊ शकतात. उत्पादन क्षमता कमी झाल्याने पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे २०२६ पर्यंत तेलाच्या किमती वाढू शकतात.

### क्रूड ऑईल महागणारच..

या क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ नरेंद्र तनेजा यांनी 'एएनआय' सोबत बोलताना म्हटले आहे, की रशिया दररोज ग्लोबल ऑईल सप्लाय सिस्टीममध्ये ५० लाख बॅरल तेल निर्यात करतो. जर रशियातून बाहेर गेले, तर कच्च्या तेलाचे दर मोठ्या प्रमाणात वाढू शकतात. क्रूड ऑईलचे दर प्रति बॅरल १०० ते १२० डॉलर प्रति बॅरल पेक्षा जास्त असू शकतात असा अंदाज वर्तवला आहे.

### केंद्र सरकार फ्रंटफफूटवर

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ लादल्याने आणि रशियाकडून तेल खरेदीस मज्जाव केल्याने तणाव वाढला आहे. भारताने तेल खरेदी थांबवल्याचा दावा ट्रम्प यांनी केला. त्यानंतर आता मोदी सरकारने मोठे वक्तव्य केले आहे, आणि हा दावा फेटाळून लावला आहे.

### सत्तर पेक्षा जास्त देशांना टॅरिफ

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ कार्डने जगभरात धुमाकूळ घातला आहे. त्यांनी ७०हून अधिक देशांना टॅरिफ लागू केला आहे. भारतावर सुद्धा तो लादण्यात आला. ट्रम्प यांनी भारत आणि रशियातील तेल व्यापारावर आक्षेप घेतला आहे. शस्त्र खरेदी करारावर नाराजी व्यक्त केली आहे. भारताने रशियाकडून इंधन खरेदी थांबवली, असा दावा त्यांनी केला.

### डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

ट्रम्प यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. मी असेच ऐकले आहे, हे खरे की खोटे याची मला माहिती नाही. पण, हे एक चांगले पाऊल आहे. आम्ही समोर काय होते, याकडे लक्ष ठेवून आहोत. ट्रम्प यांच्या दाव्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

### भारताची भूमिका काय?

ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर सरकारकडून प्रतिक्रियेची अपेक्षा व्यक्त होत होती. खरेच भारताने रशियाकडून इंधन खरेदी थांबवली आहे का? तशी काही योजना आहे का? असे प्रश्न विचारण्यात येत होते. दरम्यान, सरकारी तेल खरेदी करणाऱ्या कंपन्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. रशियाकडून तेल खरेदी न करण्यासंदर्भात कोणताही शासकीय आदेश आले नसल्याची प्रतिक्रिया कंपन्यांनी दिली. त्यामुळे अमेरिकेच्या दबावाखाली भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवणार नाही, असे तरी सध्या समोर येत आहे.

ePaper
वर्ष - 8 । अंक - 355 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com । रविवार, दि. 3ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज ठाकरेंवर बोलताना वकील जयश्री पाटील यांची जीभ घसरली



### आतील पानांत

- सिराजच्या सापळ्यात क्राऊले अडकला!
- ओव्हल कसोटी जिंकणं सोपं नाही!
- निवडणुकांमध्येही गैरप्रकाराचा आरोप
- पत्नीने पतीला संपविण्याचा घाट घातला


**वादग्रस्त वक्तव्य :** सरकारचा पैसा आहे, 'वसतिगृहासाठी 5, 10, 15 कोटी असे कितीही पैसे मागा

# आपल्या बापाचं काय जातंय ?

## संजय शिरसाट यांच्या वादग्रस्त वक्तव्याने सरकारची वारंवार कोंडी

। अकोला ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे राज्य सरकारची वारंवार कोंडी होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोनच दिवसांपूर्वी सर्व मंत्र्यांना बोलण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत तंबी दिली होती. शिक्षा म्हणून माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषी खातेसुद्धा काढून घेण्यात आले. मात्र, त्यानंतरही मंत्र्यांची वादग्रस्त विधाने थांबत नसल्याचे शनिवारी पुन्हा एकदा दिसून आले.**



अकोल्यात सामाजिक न्याय भवनाच्या उद्घाटनासाठी आलेले सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी शनिवारी पुन्हा एकदा नवा वाद ओढवून घेतला. 'वसतिगृहासाठी पाच, दहा, पंधरा कोटी असे कितीही पैसे मागा. आपण लगेच मंजूर करू. सरकारचा पैसा आहे. आपल्या बापाचं काय जातंय,' असे वक्तव्य शिरसाट यांनी केले. शिरसाट यांच्या निमित्ताने विरोधकांना पुन्हा एकदा राज्य सरकारवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. शिरसाट यांच्या या भाषणाचा व्हिडीओ व्हायरल झाला असून मंत्र्यांच्या या बेताल वक्तव्याचा सर्वत्र निषेध केला जात आहे.

निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूचा लोकार्पण सोहळा संजय शिरसाट यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाला आ. हरीश पिंपळे, आ. अमोल मिटकरी, आ. साजिद खान पठाण, सत्यपाल महाराज, समाजकल्याण आयुक्त बाबासाहेब बेलदार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आदी उपस्थित होते.

### पवन जयस्वाल शिवसेनेत

नेरचे माजी नगराध्यक्ष पवन यांनी जयस्वाल शिवसेना (उबाठा) ला जय महाराष्ट्र करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत ३१ जुलै रोजी शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला आहे. जयस्वाल यांच्या पत्नी माजी नगराध्यक्षा सुनीता जयस्वाल यांच्यासह २८ जणांनी शिवसेनेत प्रवेश घेतला. दारव्हा विधानसभा मतदारसंघातून पवन जयस्वाल यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती. पण काँग्रेसचे माणिकराव ठाकरे यांनी थेट राहुल गांधी यांच्या मार्फत उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा घडवून आणल्यावर ही जागा काँग्रेससाठी सोडली. त्यानंतरही जयस्वाल ठाकरेंसोबत होते.

संजय शिरसाट यांनी याच कार्यक्रमात राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांना बोलताना सांभाळून बोलण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की, तुमच्यामुळे माध्यमांना चांगला टीआरपी मिळतोय. तुम्ही जास्त बोलू नका नाहीतर तुमचेही आमच्यासारखे हाल होतील असा सल्ला शिरसाटांनी मिटकरींना दिला.मात्र आता शिरसाटांच्याच वक्तव्याचीच चर्चा जास्त रंगली आहे.

राज्यातील महायुती सरकारमधील मंत्र्यांच्या वक्तव्यावरुन सध्या काही मंत्री अडचणीत सापडले होते. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर त्यांच्याकडून नुकतंच कृषि खातंही काढून घेण्यात आले आहे, त्यांना कोकाटे यांची क्रीडामंत्री पद देण्यात आले आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीत सर्वच मंत्र्यांना मोजून मापून बोलण्याचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यानी अजित पवारांच्या राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांना नाव घेता सुनवाले होते. मात्र आता

## विरोधकांचा टीका सत्र सुरू

**वक्तव्याचा व्हिडीओ व्हायरल**
सरकारवर टीकेची झोड
मुख्यमंत्रींच्या सूचनेनंतरही वादग्रस्त बोलणे थांबत नाही

अनेक मंत्र्यांच्या वक्तव्यांवरून कारवाईचा इशारा
माणिकराव कोकाटेंकडून कृषी खाते काढले
मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांना तंबी दिली

**उपस्थित मान्यवर –**
आ. हरीश पिंपळे
आ. अमोल मिटकरी
आ. साजिद खान पठाण
समाजकल्याण आयुक्त बाबासाहेब बेलदार
जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम

## तरीही विरोधकांना सल्ला

सामाजिक न्याय भवनाच्या उद्घाटनासाठी अकोल्यात आलेले सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी एका बाजूला वादग्रस्त वक्तव्य करून सरकारची अडचण वाढवली, तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांना "जास्त बोलू नका नाहीतर तुमचंही आमच्यासारखं हाल होईल" असा सल्ला देत विरोधकांवर टोला लगावला. शिरसाट म्हणाले, "मिटकरी तुमच्यामुळे माध्यमांना चांगला टीआरपी मिळतोय. पण तुम्ही जास्त बोलू नका, नाहीतर तुमच्यावरही कारवाई होईल." मात्र, याच कार्यक्रमात त्यांनी स्वतःच "सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय?" असं विधान करत नवा वाद निर्माण केला आहे.
या कार्यक्रमात शिरसाटांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या टीकेवर बोलणे टाळले. "राज ठाकरे कुणाच्या व्यासपीठावर जाऊन काय बोलावं, यावर मी काही भाष्य करणार नाही," असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना शिरसाट म्हणाले, "राहुल गांधींनी आयोगाकडे पुरावे दिले तर २०२९ ची निवडणूक संपून जाईल," असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला.
या संपूर्ण घटनाक्रमामुळे संजय शिरसाट पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले असून त्यांच्या वक्तव्यांमुळे महायुती सरकारची कोंडी होण्याची शक्यता आहे.

**पुरंदर भूसंपादन** भूसंपादनाबाबत केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांची ग्वाही

# भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही!

## पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या घरी भेटी

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुरंदरमधील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राज्य सरकारने भूसंपादनाची कार्यवाही सुरू केली आहे. त्यात भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही. प्रत्येकाला विश्वासात घेऊन प्रकल्प पूर्ण केला जाईल,’ अशी ग्वाही केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शनिवारी दिली.**



बारामती येथे पंतप्रधान किसान सन्मान निधीचे वाटप मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी जेजुरीच्या खंडोबा गडावर अभिषेक आणि महापूजा केली. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, ‘पुरंदर येथे विमानतळाची अत्यंत आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी विमानतळासाठी भूसंपादनाचा निर्णय घेतला आहे. देशात कोठेही विमानतळ करायचे असेल, तर राज्य सरकारला जागा द्यावी लागते. त्याप्रमाणे राज्य सरकार भूसंपादन करील. ते करताना कोणत्याही भूमिपुत्रावर, शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. सर्वांना विश्वासात घेऊनच भूसंपादन होईल. शेतकऱ्यांशी योग्य समन्वय साधण्याचे काम येथील लोकप्रतिनिधींनी केले पाहिजे. सर्वांना विश्वासात घेणे महत्त्वाचे आहे.’बारामती येथील कार्यक्रमात मोहोळ म्हणाले, ‘पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना २०१९ पासून सुरू करण्यात आली आहे. देशभरात २०० पेक्षा अधिक ठिकाणी हा कार्यक्रम झाला आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाला सहा हजार रुपये आणि राज्य सरकार नऊ हजार रुपये असे १५ हजार रुपये जमा करत आहे. काँग्रेस सरकारच्या काळात हे होत नव्हते. काँग्रेसच्या काळात सरकारने शेतकऱ्यांसाठी एक रुपया दिला, तर ८५ पैसे कुठे जात होते, ते समजत नव्हते. आता मोदी सरकारच्या काळात रुपया असला, तरी तो लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत आहे.’मुरलीधर मोहोळ यांनी या दौऱ्यामध्ये पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या घरी, कार्यालयात भेटी दिल्या. निरा येथे भाजप कार्यकर्ते संजय निगडे यांच्या घरी, तर माळेगाव येथे रंजन तावरे यांच्या कार्यालयात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर जेजुरी येथे भाजपचे शहराध्यक्ष सचिन पेशवे यांच्या घरी भोजन केले. भाजपमध्ये प्रवेश केलेले पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप मोहोळ यांच्या दौऱ्यात सहभागी होते. जगताप यांच्या सासवड येथील घरी मोहोळ यांनी भेट दिली. या वेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष साकेत जगताप, माजी आमदार अशोक टेकवडे, तसेच जालिंदर कामठे, रंजन तावरे, भाजप जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, खंडोबा देवस्थानाचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड. विश्वास पानसे, गिरीश जगताप, भाजप शहराध्यक्ष सचिन पेशवे, अलका शिंदे, सचिन सोनवणे आदी उपस्थित होते.बारामती येथे पंतप्रधान किसान सन्मान निधीचे वाटप मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी जेजुरीच्या खंडोबा गडावर अभिषेक आणि महापूजा केली. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, ‘पुरंदर येथे विमानतळाची अत्यंत आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी विमानतळासाठी भूसंपादनाचा निर्णय घेतला आहे.देशात कोठेही विमानतळ करायचे असेल, तर राज्य सरकारला जागा द्यावी लागते.

### शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही

राज्य सरकार भूसंपादन करील. ते करताना कोणत्याही भूमिपुत्रावर, शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. सर्वांना विश्वासात घेऊनच भूसंपादन होईल. शेतकऱ्यांशी योग्य समन्वय साधण्याचे काम येथील लोकप्रतिनिधींनी केले पाहिजे. सर्वांना विश्वासात घेणे महत्त्वाचे आहे.’बारामती येथील कार्यक्रमात मोहोळ म्हणाले, ‘पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना २०१९ पासून सुरू करण्यात आली आहे.


# दादागिरीवरून राजकीय चर्चेचा धुरळा

## पुण्याच्या उद्योगक्षेत्रावरील दबावाच्या मुख्यमंत्र्यांच्या विधानावर प्रतिक्रिया

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**‘राज्याच्या गृहमंत्र्यांना वाटत असेल, की पुण्यात दादागिरी होत असल्याने गुंतवणूक येत नाही, तर मला विनम्रपणे मुख्यमंत्र्यांना विचारायचे आहे, की त्यावर तुम्ही काय कृती केलीत? तुम्हाला माहीत आहे दादागिरी सुरू आहे, तर मोडून काढा; आम्ही तुम्हाला साथ देऊ,’ असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केले. तर, ‘मी तर दादागिरी मोडून काढणारच आहे.**





त्यासाठी कुणी मदत करणार असेल, तर त्याचे स्वागत आहे,’ अशी प्रतिक्रिया यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ‘उद्योग क्षेत्रात घुसलेली दादागिरी हा पुण्याच्या विकासातील दुर्दैवाने सर्वांत मोठा अडथळा आहे,’ असे विधान मुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी पुण्यात ‘पुणे मेट्रोपॉलिटन रिजन ग्रोथ हब’च्या प्रारंभ कार्यक्रमात केले होते. त्यावर शनिवारी राजकीय प्रतिक्रिया उमटल्या.‘तुम्हाला माहीत आहे दादागिरी होत असल्याने गुंतवणूक येत नाही, तर त्याला जबाबदार कोण? मुख्यमंत्र्यांनी सांगावे, की कुणाची दादागिरी होते आहे,’ असे सुळे म्हणाल्या. ‘गुंतवणूक येत नाही, हे कबूल केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. पण, याला जबाबदार कोण, याचे उत्तरही मुख्यमंत्र्यांना द्यावे लागेल,’ असा चिमटाही त्यांनी काढला.दादागिरी कमी करण्याबाबत सर्वपक्षीय नेत्यांना एकमत करावे लागेल, कारण खूप मोठी राजकीय दादागिरी पुण्याच्या उद्योगांमध्ये पाहायला मिळते आहे,’ असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ‘विविध पक्षांची नावे घेऊन लोक दादागिरी करतात. मी तर ती मोडून काढणारच आहे, पण त्यात जो जो मदत करील.

### मी तर ती मोडून काढणारच

‘पुण्यात ‘एमआयडीसी’मध्ये दादागिरी चालू आहे,’ असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार म्हणाले, ‘ही दादागिरी अजितदादांच्या पक्षाची, भाजपची, की शिंदे यांच्या शिवसेनेची आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. दादागिरी होते आहे, हे मुख्यमंत्री म्हणून तुम्ही कबूल करत असाल, तर कोण दादागिरी करते, याचे नाव तुम्ही जाहीर करावे, असे आव्हान आम्ही सामान्य नागरिक म्हणून देतो.

शिक्षण विश्व

वायसीएममध्ये अभ्यासक्रम सुरू करण्यास राज्य शासनाची मंजूरी, सुरू होणार

# ‘इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस’!

## ६० विद्यार्थी क्षमतेसह अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महापालिकेला यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात (वाय.सी.एम) पदव्युत्तर शिक्षण संस्थेअंतर्गत बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम ६० विद्यार्थी क्षमतेसह सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अधिकृत मंजूरी मिळाली आहे. रुग्णालयाच्या आवारातील नव्याने बांधलेल्या अकरा मजली इमारतीच्या तिसऱ्या, चौथ्या व सहाव्या मजल्यावर ही ‘परिचर्या विज्ञान संस्था’ म्हणजेच ‘इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस’ संस्था सुरू करण्यात येणार आहे.**







जानेवारी २०२२ मध्ये बीएससी नर्सिंग महाविद्यालय स्थापनेबाबत पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्यानंतर प्रस्ताव तयार करून तो स्थायी समितीकडे पाठवण्यात आला. या प्रस्तावाला १० मार्च २०२२ रोजी स्थायी समिती आणि ६ एप्रिल २०२२ रोजी सर्वसाधारण सभेकडून मान्यता मिळाली. तर पदव्युत्तर संस्था वायसीएम रुग्णालयांतर्गत बीएससी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी पदनिर्मिती करण्यास २४ जून २०२४ रोजी राज्याच्या नगरविकास विभागाकडून तत्त्वतः मान्यता देण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (एमयूएचएस), नाशिक यांच्याकडे ५ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालय संलग्नतेसाठी अर्ज सादर करण्यात आला. त्यास अनुसरून सक्षमता मूल्यांकन समितीच्या शिफारशीनुसार राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने १६ जुलै २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून ३० जुलै २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम संलग्नता (एफटीए) मंजूर करण्यात आला, व पिंपरी चिंचवड महापालिकेला पदव्युत्तर संस्था वायसीएम रुग्णालय येथे बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

### सीईटी-सेलमार्फत प्रवेश प्रक्रिया

वायसीएम रुग्णालयातील पदव्युत्तर शिक्षण संस्था २०१८ मध्ये सुरू झाल्यापासून २४० हून अधिक पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी रुग्णालयाच्या अत्यावश्यक सेवांमध्ये विशेषतः कोविड-१९ काळात मोलाचे योगदान दिले आहे. राज्य शासनाने आता बीएससी नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, आरोग्य सेवा प्रणाली व महिला सक्षमीकरणाच्या दिशेने धोरणात्मक गुंतवणूक झाली आहे. या नर्सिंग महाविद्यालयाकरिता प्रवेश प्रक्रिया वैद्यकीय सेवा संचालनालय, मुंबई (सीईटी-सेल) मार्फत राबविली जाणार आहे. बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू केल्याने नर्सिंग मनुष्यबळ आवश्यकता व उपलब्धता यामधील तफावत दूर होण्यास हातभार लागेल. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उमेदवारांना कमी खर्चात तसेच पात्र उमेदवारांना शासकीय दरात शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

“ परिचर्या विज्ञान संस्था, वायसीएम रुग्णालय हे महाविद्यालय सुरू करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या महाविद्यालयामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या शैक्षणिक विकासात भर पडणार आहे.
**–डॉ. राजेंद्र वाबळे,** अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, वायसीएम रुग्णालय

---

# आकुर्डीतील फूड कोर्टमधील ५० गाळे वापराविना पडून

## फूड कोर्टचे दर नव्याने ठरणार; महिला, दिव्यांग कल्याण बचत गटांना गाळे देणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**अवास्तव भाडे ठेवल्याने वर्षभरापासून आकुर्डीमधील फूड कोर्टमधील ५० गाळे वापराविना पडून आहेत. कोणताही विक्रेता ते घेण्यास तयार नाही. मात्र, महापालिकेला आता उपरती झाली असून, नव्याने निविदा काढल्या जाणार आहेत. महिला बचत गट, दिव्यांग कल्याण बचत गटांना हे गाळे देण्याचे महापालिका प्रशासनाच्या विचाराधीन आहे.**




शहरातील होतकरू तरुण आणि महिला उद्योजकांसाठी महापालिकेने वर्षभरापूर्वी आकुर्डी येथे ‘फूड कोर्ट’ उभारले. मात्र, महापालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे आणि आडमुठेपणामुळे फूड कोर्टमधील गाळे रिकामेच आहेत. आकुर्डी परिसरात रेल्वे स्थानक, प्रमुख रस्ते, वर्दळीचा परिसर आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून मोक्याची जागा असूनही हे गाळे धूळखात अवस्थेत आहेत. एवढ्या मोठ्या जागेवर फक्त गाळे उभारले गेले. त्या जागेचा ना उपयोग होतोय, ना महापालिकेला उत्पन्न मिळत आहे. या संपूर्ण प्रकल्पावर लाखो रुपये खर्च करण्यात आला. मात्र, महापालिकेच्या अयोग्य धोरणांमुळे सध्या या गाळ्यांवर फक्त धूळ जमा होत आहे.

### समाजविकास विभागाच्या ताब्यात हे गाळे

भूमी व जिंदगी विभागाचे उपआयुक्त सीताराम बहुरे म्हणाले, ‘गेल्या वर्षी फूड कोर्टसाठी निविदा काढली होती. १० वर्षांसाठी ७० ते ७२ लाख रुपयांचे भाडे ठरविण्यात आले होते. मात्र, त्याला प्रतिसाद मिळाला नसल्याने गाळे देता आले नाहीत. त्यासाठी आता नव्याने दर मागविले आहे. महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या ताब्यात हे गाळे दिले जाणार आहेत.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### आपल्या 'मी'चे स्वरूप आनंदमय आहे

इच्छित वस्तू मिळणे यात समाधान असतेच असे नाही. ती इच्छाच नाहीशी करणे यात समाधान आहे. हाव संपेल तेव्हाच समाधान होईल. याकरिता वासनाक्षय कशाने होईल ते पाहावे. कशात सुख आहे, कशाची कास धरावी, इकडे लक्ष द्यावे. खरा आनंद आणि समाधान भगवंताचे होण्यातच आहे. ' भगवंता, तुझ्यावाचून माझे कोणी नाही ' हे ज्या दिवशी मनाने पक्के ठरेल, त्याच दिवशी समाधान मिळेल. जितकी विषयाची आवड धरावी, तितके दु:खच पदरात येते. विषयसुख न मागताही येते; परंतु जे परमार्थाच्या आड येणार आहे, ते मागत कशाला राहायचे ? माझ्या मागे राम आहे म्हटले, म्हणजे प्रपंचातल्या विषयात जरी राहिलो तरी भिण्याचे कारण नाही. भगवंताचा आधार कायम ठेवला की मग विषयांची नाही भीती वाटत. नेहमी अनुसंधानात राहिले म्हणजे मग ' सावधच' राहिल्यासारखे आहे.

दिवाळी हा आनंदाचा दिवस असतो, पण दिवाळीचा दिवस हा इतर दिवसांसारखाच असतो. इतकेच नव्हे, तर आदल्या दिवसाची परिस्थिती, संकटे आणि अडचणी त्या दिवशीही कायम असतात. याचा अर्थ असा की, परिस्थितीत बदल होत नाही. दिवाळीचा दिवस, हा दिवस या नात्याने निराळा नाही. पण काल आपण जे केले, ते दिवाळीच्या दिवशी आपण करीत नाही, हाच मुख्य फरक होय. आपणच दिवाळीच्या दिवसाला आनंदाचा दिवस करतो. हे जर खरे, तर तसा तो आपण नेहमीच का करू नये ? आपल्याला नेहमीच दिवाळी असावी; आपण नेहमीच आनंदात असावे; आणि त्याकरिता आनंदमय अशा भगवंताचा आधार घ्यावा. आपण दिवाळीच्या सणाचा आधार घेऊन आनंदी-आनंद करतो. मग आनंद जो निर्माण करतो त्या भगवंताच्याच आश्रयाला नेहमी का न जावे ? भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व वाटत नाही. भगवंताचे स्वरूपच मुळी आनंदमय आहे. असा आनंदमय भगवंत आपल्या आतमध्ये असून आपण दु:ख भोगतो याला कारण, भगवंताला प्रकट व्हायला आपणच आपल्या आतमध्ये आडकाठी करीत असतो. आपल्या आतमध्ये भगवंत तर आहेच, पण त्याचबरोबर ' मी ' सुद्धा आहे. हा ' मी ' कोण हे जाणण्याकरिता, इंद्रियांची गडबड शांत करून आतमध्ये आपण आनंदाचा शोध करावा; म्हणजे आपल्याला या ' मी ' चे स्वरूपही आनंदमय असल्याचे प्रत्ययाला येईल. अशी परमात्म्याची ओळख करून घेणे ही खरी जीवनाची सुरुवात आहे; आणि परमात्म्यात विलीन होणे हेच जीवनाचे सर्वस्व होय.

बोधवचन:- ज्याचा आनंद टिकेल त्याला नित्य दिवाळी आहे.

# आता, पापाचा भरलाय घडा, ट्रम्पना शिकवू चांगलाच धडा !



'स्टेट'मेंट


अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक


**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रोजची वक्तव्ये आणि त्यांनी मारलेल्या कोलांटउड्या पाहिल्या, की हा माणूस अतिशय बुद्धीवंत करी असावा किंवा बिनडोक असावा, अशी शंका मनात येऊन जाते. पण, गेल्या काही दिवसात त्यांनी पाकिस्तानला दिलेले झुकते माप आणि भारताबाबत ओकलेली गरळ पाहता त्यांच्या पापाचा घडा भरलेला आहे आणि त्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे, असे मानायला मुळीच हरकत नाही !**



### २५ टक्के कर आकारणी..

भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के कर लादण्याचा निर्णय अमेरिकेनं घेतला आहे. दि. १ ऑगस्टपासून हे दर लागू होतील, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर जाहीर केले होते. मात्र, शुक्रवारी हा निर्णय एक आठवड्यासाठी त्यांनी मागे घेतला आहे. कदाचित हा निर्णय रद्दही होण्याची शक्यता आहे. त्यावेळी त्यांनी रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याबद्दल अतिरिक्त दंड लादण्याचा इशाराही त्यांनी दिल्याचे वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटले आहे.

### प्रत्येक देशाचे दररोज जाहीर केले...

युक्रेनसोबत रशियाने दि. ७ ऑगस्टपूर्वी शस्त्रसंधी केली नाही, रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्यांवर १०० टक्के दराने अतिरिक्त कर लादण्याचा इशारा त्यांनी यापूर्वीच दिला आहे. जपान आणि युरोपियन महासंघावर १५ टक्के, फिलिपिन्स आणि इंडोनेशियावर १९ टक्के, बांगलादेशावर ३५ टक्के, थायलंडवर ३६ टक्के आणि मलेशियावर २५ टक्के दराने कर लादण्याचा निर्णय अमेरिकने जाहीर केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचे हे निर्णय किती दिवस टिकणार हे दि. ७ ऑगस्ट नंतर कळेल. मात्र ते तसे राहतील असे सध्या तरी वाटत नाही.

### प्रत्येकाशी भांडण कशासाठी?

अमेरिका हे ताकदवान राष्ट्र समजले जाते. मात्र,जगातील सगळ्यांशी भांडण करून आपली ताकद वाया घालवणे, अमेरिकेतील मंडळींना परवडणारे नाही. अमेरिकेला चीनसह अनेक देशांवर अनेक बाबींसाठी अवलंबून राहावे लागते. हे अवलंबित्व आयात शुल्क वाढवून कमी करता येणार नाही, याची जाणीव झाली, की त्यांचे निर्णय मागे घेतले जातात. त्यांच्या या लहरी स्वभावाची ओळख आता जगाला व्हायला लागली आहे. अर्थात् आपली देशातील विरोधी पक्षाला अजून झाली नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल!

### लहरी आणि अनाकलनीय वागणे..

भारताच्या बाबतीत तर डोनाल्ड ट्रम्प यांचे वागणे केवळ लहरी , अनाकलनीय आणि वेडसरपणाची झाक असणारे आहे. युद्ध भारत - पाकिस्तन मध्ये.. विषय दहशदवादाचा.. पाकला युद्ध डोईजड जाते, हे समजल्यावर त्यांनी, त्यांच्या लष्कर यंत्रणेने युद्ध थांबवण्याची विनंती केली. भारतालाही जीवित, आर्थिक हानीमुळे युद्ध मनापासून नको होते. पाकची विनंती आपण स्वीकारली, मात्र या पुढे दहशदवादी हल्ला पाकचे युद्ध समजून उत्तर दिले जाईल, हे स्पष्ट शब्दात धमकावले.

### नको तिथे नाक खुपसणे..

युद्ध थांबते हे पाहून डोनाल्ड ट्रम्प यांनी आपणच हे युद्ध थांबविल्याचा दावा केला. एकदा नाही २९ वेळा त्यांनी हा दावा केला आणि नाक खुपसले आहे. भारताच्या लष्करासह पंतप्रधांनी गृह, संरक्षण, परराष्ट्र मंत्र्यांनी ट्रम्प यांचा दावा फेटाळला. पण त्यातून ते काहीही अक्कल शिकलेले नाहीत.

### 'ट्रम्प इज अ लायर..!'

पाकने अमेरिकेचा युद्ध थांबवण्यात सम्बन्ध नाही, हे वारंवार सांगितले. मात्र, आपल्या देशातील विरोधी पक्षाला 'ए ट्रम्प यु आर लायर ' या वाक्यात मोदींनी दिलेले उत्तर ऐकायचे होते. त्यापुढे जाऊन ट्रम्प यांनी पाकशी खनिज तेल संबंधात केलेला करार,२५ टक्के आयात शुल्क हा आपल्या देशाला दिलेला दणका आहे, असे सांगायला देशातील विरोधकांनी सुरुवात केली. आता, युद्ध थांबावे हे पाकचे म्हणणे होते. ट्रम्पनी मोदींना फोन केला नव्हता. मोदींनी अमेरिकेच्या उपाध्यक्षाला युद्ध सुरु राहणार हे ठणकावून सांगितले होते. भारत अमेरिकेकडे गेला नव्हता. पाक अमेरिकेकडे गेल्याची शक्यता जास्त आहे. पाकचे खनिज तेल मिळवण्यासाठी अमेरिकेने हा खटाटोप केल्याची शक्यता जास्त आहे. युद्ध भर विजयापर्यंत झाले असते, तर पाकबरोबर अमेरिकेला वाटाघाटी करता आल्या नसत्या हा धोका होता, हे भारताच्या केव्हाच लक्षात आले आहे.

### कदाचित ट्रम्प यांनाच कॉन्ट्रॅक्ट

कदाचित, ट्रम्प यांच्या कंपनीलाच पेट्रोल काढण्याचे कंत्राट मिळणार असेल आणि तीन तीन ठिकाणी युद्ध थांबवल्याचे श्रेय घेत शांततेचे नोबेल मिळवण्याचा त्यांना घाट असेल..हा घाट भारताने उधळला म्हणून ट्रम्प बिथरले आणि विस्कटले आहेत. विषय भारत पाकिस्तानचा.. पण, ट्रम्प यांना मिरवून घ्यायचे होते, हे तर बेगानी शादीमें अब्दुल्ला दिवाना..असेच आहे.

### भारताची पावले सावध हवीत !

डोनाल्ड ट्रम्प हा अत्यंत भंपक माणूस आहे हे संपूर्ण जगाच्या लक्षात आले आहे, नरेंद्र मोदी यांच्या तर नक्की आले असणार ! भारत आणि अमेरिकेतील पूर्वीचे संबंध वेगळे..आणि आत्ताचे वेगळे हे लक्षात घेऊन भारताने पावले टाकायला हवीत! भारताचा वापर हा फक्त स्वार्थासाठी करायचा एवढाच चंग ट्रम्प यांनी बांधलेला दिसतो. अर्थात त्यांच्या या मनसुब्याला सुरुंग लावण्याचे काम भारताने केले पाहिजे आणि वेळीच सावध पावले उचलायला हवीत, हे निश्चित!


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




भूमिका

# वसाहतवादाच्या वारशाशी लढण्याचे मार्ग

**'वसाहतवादाचा वारसा' या शब्दप्रयोगाला आजकाल राजकीय क्षेत्रात अतोनात महत्त्व आलं आहे गेल्या दीड वर्षापासून. कारण तेव्हा आपली राज्यघटना हाच 'वसाहतवादी वारसा' असल्यामुळे राज्यघटनाच बदलून टाकू, असा सूर एका विद्वानानं लावला होता. हा विद्वान कोणत्या राजकीय पक्षाकडे झुकलेला, वगैरे चर्चा करण्याची ही जागा नव्हे पण 'अतोनात' म्हणजे किती याचं ते उदाहरण होतं.**

त्यानंतर भारत सरकारनंही अनेक कायदे बदलून टाकताना 'वसाहतवादी वारसा आम्ही पुसतो आहोत' असा नैतिक पवित्रा घेतला होता. कला ही राजकारणाच्या बाहेरच असायला हवी वगैरे कबूल. पण 'वसाहतवादाचा वारसा' हा सांस्कृतिक क्षेत्रातही कसा आहे, याची 'सेन्गोल'च्या निमित्तानं झालेली चर्चा असो की या देशाची उन्नत बौद्धिक परंपरा परक्या शासकांमुळेच कशी लयाला गेली हे हल्ली सांगू लागलेल्या काही विद्वानांची पुस्तकं असोत, वसाहतवाद या संकल्पनेच्या पुन्हा होत असलेल्या चिकित्सेतून एक सांस्कृतिक मांडणी केली जाऊ शकते, असं सध्या स्पष्ट दिसतं आहे. सांस्कृतिक अंगांसकट ही पुन्हा होणारी चिकित्सा नवीसुद्धा असावी, यासाठी खरं तर इतिहासाइतकंच 'वसाहतवादी कृतीकार्यक्रमा'कडे- अजेंड्याकडे- नीट पाहावं लागेल,



त्यातून वसाहतवाद नेहमी 'परक्या शासकां'चाच असतो का असाही प्रश्न पडेल. वसाहतवादी अजेंडा हा मूलतः भांडवलदारीचा. वसाहतींमधून कमी दरांत कच्चा माल घ्यायचा आणि वसाहतकार देशात धाडून, मूल्यवर्धन करून तो जास्त दरात विकायचा, हे वसाहतवादामुळे होणारं नुकसान असल्याचं साधार मत दादाभाई नौरोजींनी मांडलं होतं. यात ताज्या चिकित्सेसाठी आवश्यक तपशील असा की, वसाहतवादी ज्या क्षेत्रांत 'प्रगत' ठरले होते त्याच क्षेत्रांत वसाहतींमधली प्रजा 'मागास' कशी आहे, हे कथ्यकथन (नॅरेटिव्ह) वसाहतकारांनी ठसवलं होतं. या तथाकथित मागास प्रजेच्या संस्कृती- परंपरांचं वैचित्रीकरण (एग्झॉटिसायझेशन) वसाहतकारांनी केलं होतं. आता आपल्या विषयाकडे येऊ. तो आहे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोककलांशी भारतीय आणि अभारतीयांनी जी वर्तणूक केली ती या अर्थानं 'वसाहतवादी'च ठरते, हा. उदाहरणार्थ वारली कलेकडे पाहू. वारली समाजातल्या प्रथांचा भाग असलेली ही कला. पण 'वारली आर्ट'कडे लक्ष देताना या समाजाच्या अन्य प्रथांचं निव्वळ वैचित्र्य पाहिलं गेलं. वारली कलेबाबत भास्कर कुलकर्णी यांनी 'वीव्हर्स सर्व्हिस सेंटर'साठी केलेल्या अभ्यासाची चिकित्सा झालेली नाही, पण यशोधरा दालमियांनी जणू याविषयीच्या पहिल्या संशोधक स्वतःच असल्याच्या थाटात लिहिलेल्या 'पेण्टेड वर्ल्ड ऑफ द वारलीज' या पुस्तकात वारली जनजीवनाचं वैचित्रीकरण पदोपदी दिसतं. हेच अन्य लोकचित्रकलांबद्दल झालं आहे. जिव्या सोमा मशे (नेदरलँड्सचा प्रिन्स क्लॉस पुरस्कार- २००९, पद्मश्री- २०११) हे पहिले जगप्रसिद्ध वारली चित्रकार. मशे यांना इटली, जर्मनी आदी देशांत भित्तिचित्रं करण्याची संधी मिळाली, काही युरोपीय कलादालनं त्यांच्या कलाकृती विकायला तयार झाली. आर्थिक व्यवहार पारदर्शक होता का, हा प्रश्नही तेव्हा कुणी विचारला नाही. पण दुसराही मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यांच्या कलाकृतींना प्रसिद्धी मिळाली तसतशी या 'वारली आर्ट'मधली 'डिझाइन्स'(!) कॉपी करण्याचा प्रकार सरसकट होऊ लागला. आपण बौद्धिक संपदेची चोरी करतो आहोतशहरोशहरींच्या 'हॉबी क्लासेस'मध्ये 'वारली आर्ट'चे वर्ग सुरू झाले. यात काहींनी तर वारली कला आणि साधारण तशीच दिसणारी ओडिशातली 'सौरा' शैली यांमध्ये गोंधळ घालून ठेवणाऱ्या तथाकथित डिझाइन्सचा सुळसुळाट केला. हे पाहून दादाभाई नौरोजी नक्कीच संतापले असते. हा झाला पहिला टप्पा. पण जिव्या सोमा मशे काय किंवा राजेश वांगड यांच्यासारखे नंतरच्या पिढीतले चित्रकार काय, त्यांनी बदलत्या भोवतालाला जिथल्या तिथं- जेव्हाचा तेव्हाच प्रतिसाद दिला आणि त्यांच्या चित्रांमध्ये शाळा, डबलडेकर बस, आगगाडी, हॉस्पिटल, ॲम्ब्युलन्स हे सारं येऊ लागलंपुजणाऱ्या सांस्कृतिक परंपरेमधल्या चित्रांत डबलडेकर बस वा ॲम्ब्युलन्स येणं हे सांस्कृतिक गुलामगिरीचं/ शरणागतीचं/ संस्कृतीद्रोहाचं लक्षण ठरवायचं का?

## संपादकीय »

### खुमारी...!

***सिनेर, अल्काराझ, होल्गर रून यांच्या रूपाने टेनिसला नवे विजेते मिळत असतीलही, तर त्याचा फायदा खेळालाच होणार.***

टेनिसला नवीन पिढीची गरज आहे. भविष्य अनिश्चित असले, तरी सुखावह म्हटले पाहिजे...' तीन सम्राटांच्या अनभिषिक्त मक्तेदारीच्या पार्श्वभूमीवर उमटलेले हे उद्गार कुण्या टेनिसरसिकाचे वा विश्लेषकाचे नाहीत. ते निघाले आहेत, यान्निक सिनेर या इटालियन नवोन्मेषी टेनिसपटूच्या मुखातून. एरवी इतक्या धाडसी विधानांबद्दल टेनिसमधील त्रिमूर्तींच्या भक्तांकडून सिनेरची शेलक्या शब्दांत निर्भर्त्सना झाली असती. आता ते संभवत नाही, कारण सिनेरने नुकतीच ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा जिंकून कारकीर्दीतले पहिलेवहिले ग्रँड स्लॅम अजिंक्यपद पटकावले आहे. हे करताना उपान्त्य फेरीत नोव्हाक जोकोविच या 'मेलबर्नच्या मनसबदारा'ला त्याने मात दिली आहे टेनिसमधील महान त्रिमूर्तींपैकी स्वित्झर्लंडचा रॉजर फेडरर निवृत्त झाला आहे आणि स्पेनचा राफेल नडाल त्या वाटेवर आहे. त्या सुवर्णयुगातील जोकोविच तेवढा अजूनही खेळतोय.

**कालिदासच्या 'कुमारसंभवम्'च्या पहिल्या सर्गातील हा पहिला श्लोक. त्यावरून कळते की हिमालय हा 'नगाधिराज -पर्वतांचा राजा' – असल्याचे पहिल्या शतकातील कालिदासालाही माहीत होते. पण केवळ १५८ वर्षांपूर्वीही तो नगाधिराज नेमका केवढा लांबरुंद व किती उंच आहे हे मात्र कुणाला माहीत नव्हते.**

# भूगोलाचा इतिहास : आणि हिमालय

कारण त्यापूर्वी हिमालयाचे मोजमाप कधी करण्यातच आले नव्हते.८०३ मध्ये विलियम लॅम्बटन यांनी भारताच्या 'ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हे'ची सुरुवात केली, त्याच सुमारास चार्ल्स क्रॉफर्ड हा ब्रिटिश पथकप्रमुख पूर्व नेपाळमध्ये गेला होता. या भागातील पर्वत व शिखरे अतिप्रचंड असल्याचे त्याच्याकडून इतरांना समजले. ते ऐकून कर्नल वेब या ब्रिटिश सेनाधिकाऱ्याने १८०९-१० मध्ये त्या भागातील शिखरांची उंची मोजली. तेथील 'धवलगिरी' हे शिखर २६ हजार फुटाहून उंच असल्याचे त्याने जाहीर केले. मात्र त्यावर कुणाचा विश्वासच बसला नाही. कारण दक्षिण अमेरिकेत बोलेव्हियातील अँडीज पर्वताचे 'अंकोह्युमा' ( उंची २३ हजार १२ फूट) हे त्याकाळी जगातले सर्वोच्च शिखर मानले जाई. पण हिमालय हा जगातला सर्वात उंच पर्वत असण्याची शक्यता क्रॉफर्ड व वेब यांच्यामुळे भूसंशोधकांच्या लक्षात आली. दरम्यान मराठा राज्य लयास गेले. ब्रह्मदेशही जिंकल्यावर




बहुतेक भारत व हिमालयाचाही बराच भाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली आला. त्यामुळे हिमालयाची मोजमापे घेणे व नकाशे तयार करणे शक्य होऊ लागले. पण नेपाळ व तिबेटमध्ये मात्र परकीयांना मज्जाव होता. १८४३ मध्ये जॉर्ज एव्हरेस्ट निवृत्त झाल्यावर ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हेचे नेतृत्व कर्नल अँड्र्यू वॉ यांचेकडे आले. त्यांच्या काळात हिमालयातील शिखरांची उंची निश्चित करण्याचे काम सुरू झाले. हिमालयाच्या रांगा पूर्व पश्चिम पसरलेल्या आहेत. त्यापैकी भारताच्या बाजूने लागणाऱ्या पहिल्या कमी उंचीच्या रांगांना 'शिवालिक टेकड्या' म्हणतात. त्यानंतर अधिक उंचीच्या 'मध्य हिमालय' व त्याच्या पलीकडे सर्वात उंच 'बृहद् हिमालय' या रांगा आहेत. या तिन्ही रांगांच्या पलीकडे ज्या रांगा आहेत, त्यांना 'पार हिमालय' (ट्रान्स हिमालय) म्हणतात. हिमालयातील सर्वोच्च शिखरे मध्य व बृहद् हिमालय रांगांत आहेत. पण अलीकडे असणाऱ्या शिवालिक टेकड्यांमुळे, त्यांच्या पलीकडची उंच शिखरे दिसत नाहीत. मात्र उत्तर बंगालमध्ये, दार्जिलिंग परिसरात शिवालिक रांगा नाहीत. त्यामुळे अगदी दूरवरून, दार्जिलिंग येथूनही, या भागातील कांचनजंगा व इतर शिखरांचे दर्शन घडते. या सर्व पार्श्वभूमीवर कर्नल वॉ यांनी या परिसरातील शिखरांची मोजणी करण्याचे ठरवले.

या भागातील ७९ शिखरांची उंची व नकाशातील स्थान निश्चित करण्याचे कार्य, वॉ यांच्या नेतृत्वाखाली १८४९ ते १८५५ मध्ये हाती घेण्यात आले. या शिखरांचे वेधही दूरवरूनच घ्यावे लागणार होते. कारण यापैकी बहुतेक शिखरे तिबेट आणि नेपाळमध्ये होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**महादेवीला परत करा**

## कोल्हापूरच्या महादेवी हत्तीणीसाठी कामराही मैदानात

# हा देश अंबानीच्या मुलाच्या बापाचा नाही

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेली ३५ वर्षे कोल्हापूरच्या शिरोळमधील नांदणी गावातील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठातील महादेवी ही हत्तीण गुजरातच्या जामनगर येथील 'वनतारा' मध्ये नेण्यात आली आहे. यावरून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त केला जात आहे. त्या विरोधात तीव्र जनभावना निर्माण होत असून अनेक गावांमध्ये आंदोलने केली जात आहेत. यादरम्यान या लढ्यात आता स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने देखील उडी घेतली आहे.**

## जिओचे नंबर बदलून बहिष्कार





कुणाल कामरा हा त्याच्या स्टँडअप कॉमेडीमधून सतत देशातील राजकीय घडामोडींवर भाष्य करत असतो. यामुळे बऱ्याचदा तो वादात देखील सापडला आहे. आता पुन्हा एकदा त्याने सोशल मीडियावर अशीच पोस्ट केली आहे. यावेळी त्याने त्याच्या पोस्टमध्ये महादेवी या हत्तीणीला कोल्हापूरकरांना परत दिले जावे असे म्हटले आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये कामरा म्हणाला की, "ये देश अंबानी के बेटे के बाप का नहीं है (हा देश अंबानीच्या मुलाच्या बापाचा नाही). माधुरी/महादेवीला कोल्हापुरला परत करा...". याबरोबरच त्याने महादेवीचा फोटो देखील पोस्ट केला आहे. कुणाल कामराच नाही तर मराठी मनोरंजन क्षेत्रातील अनेक कलाकारांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करत महादेवीला परत आणण्याबाबत भावना व्यक्त केल्या आहेतदरम्यान महादेवीला नेण्यात आले आहे तो वनतारा प्रकल्प हा मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानी यांची कल्पना आहे आणि या वनतारा प्रकल्पाला रिलायन्स इंडस्ट्रीज आणि रिलायन्स फाउंडेशनचे पाठबळ आहे.अंबानी समूहाच्या वनतारा प्रकल्पामध्ये महादेवीला नेल्यानंतर या समूहाच्या विविध उत्पादनांवर बहिष्कार घालण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत हजारो लोकांनी जिओचा मोबाइल क्रमांक पोर्ट केल्याचा दावा केला जात आहे. हत्ती परत आणण्यासाठी अंबानी समूहाच्या जिओचे मोबाइल नंबर बदलून बहिष्कार मोहीम राबवली जात आहे. आमदार राहुल आवाडे यांनीही आपल्याकडील जिओचा एक नंबर दुसऱ्या कंपनीत बदलत असल्याचे सांगितले. दरम्यान लोकांची भावना पाहाता वनताराच्या व्यवस्थापनाशी चर्चा करून महादेवीला परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांना यश कधी येते हे पहावे लागणार आहे.कुणाल

### अंबानीविरोधात रोष वाढला

दरम्यान लोकांची भावना पाहाता वनताराच्या व्यवस्थापनाशी चर्चा करून महादेवीला परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांना यश कधी येते हे पहावे लागणार आहे.गेली ३५ वर्षे कोल्हापूरच्या शिरोळमधील नांदणी गावातील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठातील महादेवी ही हत्तीण गुजरातच्या जामनगर येथील 'वनतारा' मध्ये नेण्यात आली आहे.


कामरा हा त्याच्या स्टँडअप कॉमेडीमधून सतत देशातील राजकीय घडामोडींवर भाष्य करत असतो. यामुळे बऱ्याचदा तो वादात देखील सापडला आहे. आता पुन्हा एकदा त्याने सोशल मीडियावर अशीच पोस्ट केली आहे. यावेळी त्याने त्याच्या पोस्टमध्ये महादेवी या हत्तीणीला कोल्हापूरकरांना परत दिले जावे असे म्हटले आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये कामरा म्हणाला की, "ये देश अंबानी के बेटे के बाप का नहीं है (हा देश अंबानीच्या मुलाच्या बापाचा नाही). माधुरी/महादेवीला कोल्हापुरला परत करा...". याबरोबरच त्याने महादेवीचा फोटो देखील पोस्ट केला आहे. कुणाल कामराच नाही तर मराठी मनोरंजन क्षेत्रातील अनेक कलाकारांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करत महादेवीला परत आणण्याबाबत भावना व्यक्त केल्या आहेतदरम्यान महादेवीला नेण्यात आले आहे तो वनतारा प्रकल्प हा मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानी यांची कल्पना आहे आणि या वनतारा प्रकल्पाला रिलायन्स इंडस्ट्रीज आणि रिलायन्स फाउंडेशनचे पाठबळ आहे.अंबानी समूहाच्या वनतारा प्रकल्पामध्ये महादेवीला नेल्यानंतर या समूहाच्या विविध उत्पादनांवर बहिष्कार घालण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत हजारो लोकांनी जिओचा मोबाइल क्रमांक पोर्ट केल्याचा दावा केला जात आहे. हत्ती परत आणण्यासाठी अंबानी समूहाच्या जिओचे मोबाइल नंबर बदलून बहिष्कार मोहीम राबवली जात आहे.

# जीवनातील धर्माचा प्रभाव कमी होईल

## समरता साहित्य संमेलनात प्रदीप रावत यांचे मत

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**समान नागरी कायदा जर लागू झाला तर लौकिक जीवनातील धर्माचा प्रभाव कमी होईल, असे मत आंबेडकर व सावरकर जीवनाचे अभ्यासक तथा पुण्याचे माजी खासदार प्रदीप रावत यांनी व्यक्त केले. नांदेड येथील समरसता साहित्य संमेलनामध्ये प्रकट मुलाखती दरम्यान ते बोलत होते.**



भरत आमदापुरे आणि स्नेहलता स्वामी यांनी रावत यांना सामाजिक समता, संविधान, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक समस्या याबाबत प्रश्न विचारले. यावेळी राज्याचे माजी शिक्षण सहसंचालक डॉ. गोविंद नांदेडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद हे दोन शब्द संविधानामध्ये कालांतराने म्हणजे आणीबाणीच्या वेळी घुसडविण्यात आले. ब्रिटीशांचे आगमन ही बाब भारतासाठी इष्टापत्ती ठरली. त्या काळात मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन झाले. अक्षरशः धर्म नाकारण्यापासून ते नवनवीन धर्म काढण्यापर्यंत सामाजिक सुधारकांनी काम केले. त्या काळात देशात आणि महाराष्ट्रात

### हिंदुत्व हे प्रबोधनयुगाचे अपत्य

संविधान आणि हिंदुत्व हे प्रबोधनयुगाचे अपत्य आहे. ब्रिटीशांच्या आगमनानंतर सुमारे एक हजार वर्षांनी हिंदू समाजात प्रचंड घुसळण झाली. संविधान हे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन मूल्यांवर आधारित आहे. लोकशाहीच्या चौकटीतून राजकीय लोकशाही निर्माण करता येते. पण जोपर्यंत सामाजिक व आर्थिक समता येत नाही, तोपर्यंत समता येणार नाही, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

धार्मिकदृष्ट्या खूप मोठी वैचारिक घुसळण झाली. जणू काही समुद्रमंथनच झाले. हे सर्व काम प्रामुख्याने हिंदू धर्माबाबतच झाले, असे रावत यांनी सांगितले. या समाज सुधारणेचा इस्लाम धर्मीयांवर फारसा परिणाम झाला नाही. जितकी चिकित्सा हिंदू धर्माची झाली, तितकी मुस्लीम धर्माची झाली नाही, या बाबीकडे रावत यांनी लक्ष वेधले. ब्रिटीशांच्या सुधारणा आणि समाजसुधारकांच्या कामामुळे मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळांमध्ये आजघडीला सुमारे ७५ हजार मुली शिक्षण घेत आहेत, असे ते म्हणाले.

**निवडणुक गैरप्रकार**

## निवडणूक यंत्रणा मृतवत राहुल गांधी यांची टीका

# निवडणुकांमध्येही गैरप्रकाराचा आरोप!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशातली निवडणूक यंत्रणा आधीच मृतवत झाली आहे, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी निवडणूक आयोगावरील हल्ला आणखी तीव्र केला. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्येही गैरप्रकार झाले होते असा आरोपही राहुल यांनी केला. दिल्लीमधील विज्ञान भवन येथे काँग्रेसतर्फे एकदिवसीय राज्यघटनेसमोरील आव्हाने या विषयावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले.**

## आयोग मोदींच्या हातातील बाहुले



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अगदी कमी संख्याबळाने आपल्या पदावर आहेत आणि काही जागांचा फरक पडला असता तर ते त्यांच्या खुर्चीत नसते असा दावा राहुल यांनी केला. यावेळी त्यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीसंबंधी काँग्रेसने संकलित केलेल्या डेटाचे उदाहरण दिले. पक्षाने एका मतदारसंघामध्ये ६.५ लाख मतदारांचे छायाचित्र आणि नावे यांची प्रत्यक्ष पडताळणी केली असून त्यामध्ये १.५ लाख मतदार बनावट असल्याचे आढळले, असे काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे. “आम्ही हा डेटा प्रसिद्ध करून तेव्हा निवडणूक यंत्रणेत काय घडत आहे याविषयी तुम्हाला धक्का बसणार आहे. हे अक्षरशः अणुबॉम्बसारखे आहे,” असा दावा राहुल गांधी यांनी चर्चासत्रात बोलताना केला. आपल्याकडे या गैरप्रकारांचा १०० टक्के पुरावा आहे असे राहुल म्हणाले. राज्यघटनेचे संरक्षण आणि बचाव करणारी संस्था नष्ट झाली असून ती इतरांनी ताब्यात घेतली आहे अशी टीका त्यांनी निवडणूक आयोगावर केली.कृपया हे लक्षात घ्या की देशाच्या पंतप्रधानांकडे अगदी थोडक्यात बहुमत आहे. जर १० ते १५ जागांमध्ये गैरप्रकार झाले असले, प्रत्यक्षात हा आकडा ७०-८० ते १०० दरम्यान असावा अशी आमची शंका आहे. (अन्यथा) ते देशाचे पंतप्रधान झाले नसते. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली असता विज्ञान भवनात उपस्थित काँग्रेस कार्यकर्त्यांनी “देशाचा राजा कसा असावा, राहुल गांधी यांच्यासारखा असावा,” अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. त्यावर राहुल यांनी त्यांना शांत व्हायला सांगितले आणि “मला राजा व्हायचे नाही. मी राजाच्या, या संकल्पनेच्या विरोधात आहे,” असे उत्तर दिले.या कार्यक्रमात बोलताना, निवडणूक आयोग पंतप्रधान मोदींच्या हातातील बाहुले झाले असल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. पंतप्रधान मोदी समाजाची विभागणी करतात आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवर मौनव्रत धारण करतात असे खरगे म्हणाले. पंतप्रधान मोदी आणि भाजपच्या राज्यात राज्यघटना धोक्यात असून त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक काँग्रेस नेता आणि कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे असे आवाहन त्यांनी केले.पाटणा : राहुल गांधी यांनी मतांच्या चोरीचा अणुबॉम्बसारखा पुरावा दाखवावाच असे आव्हान भाजप नेते आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिले. पाटण्यामध्ये एका माध्यमसमूहाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला ते उपस्थित होते. त्यावेळी राजनाथ यांनी राहुल यांना ‘पुराव्यांचा अणुबॉम्ब फोडताना आपण स्वतः जखमी होणार नाही याची काळजी घ्यावी,’ असा खोचक सल्लाही दिला. तसेच राहुल गांधी यांचे संसदेतील ऑपरेशन सिंदूरवरील भाषण फुसका बार होता अशी टीकाही राजनाथ सिंह यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अगदी कमी संख्याबळाने आपल्या पदावर आहेत आणि काही जागांचा फरक पडला असता तर ते त्यांच्या खुर्चीत नसते असा दावा राहुल यांनी केला.

### मला राजा व्हायचे नाही

या वृत्ताबाबत विचारले असता, भारतातील तेल कंपन्यांनी रशियातून तेलखरेदी थांबविल्याबाबत काही माहिती नसल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले.भारत-अमेरिकेमधील संबंध अनेक स्थित्यंतरांतून गेल्याची वस्तुस्थितीही मांडली. भारत-रशियाच्या अर्थव्यवस्था मृतवत असून, त्या एकत्रित बुडाल्या, तरी मला त्याची फिकीर नाही.

---

# पत्नीने पतीला संपविण्याचा घाट घातला

## पण नशीबानं दिली साथ आणि पतीचा जीव वाचला

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमधील मुस्कान रस्तोगी आणि मध्य प्रदेशच्या सोनम रघुवंशी या दोन महिला आरोपींनी आपल्याच पतीची हत्या केल्याचे प्रकरण नुकतेच गाजले होते. त्यानंतर उत्तर प्रदेशच्या बरेली जिल्ह्यातील एका प्रकरणाची चर्चा आता होत आहे. बरेलीतील इज्जत नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत साधना नामक महिलेने आपल्या पती राजीव यांना संपविण्याचा कट रचला.**



यासाठी तिने आपल्या पाच भावांना या कटात सामील करून घेतले. भावांनीही काही गुंडासह भावोजीला संपविण्याचा प्रयत्न केला. मात्र राजीव बचावले असून त्यांच्या हातापायाला गंभीर दुखापत झाली. आरोपी पत्नी साधनाने स्वतःच्या नवऱ्याला मारण्यासाठी पाचही भावांना तयार केले. भावांनी काही गुंडांच्या मदतीने भावोजींचे हात-पाय तोडले. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांना जंगलात नेले. तिथे जिवंत पुरण्यासाठी खड्डाही खणला. मात्र तेवढ्यात तिथून काही लोक येत असल्याची चाहूल लागल्यामुळे मारेकरी जखमी राजीवला टाकून पळून गेले.प्रत्यक्षदर्शींनी जखमी राजीवला पाहून तात्काळ रुग्णालयात दाखल केले. आता राजीव यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान पतीला संपविण्याची योजना का आखली? त्यामागचे कारण काय होते? याबाबतची अधिक माहिती मिळू शकलेली नाही.२१ जुलै रोजी पत्नी साधनाने राजीवची हत्या करण्याचा कट रचला. यासाठी तिच्या भावासह इतर मारेकरी मिळून ११ जण रात्री राजीवच्या घरी गेले. तिथे त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला. हातापायाला गंभीर दुखापत केल्यानंतर एका गाडीत टाकून जवळच असलेल्या जंगल परिसरात त्याला नेण्यात आले. तिथे खड्डा खणून राजीवला जिवंत पुरायचा त्यांचा मानस होता.

### ८ वर्षे वय असेलली दोन मुले

आता राजीव यांचे वडील नेतराम यांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण ११ जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत. सर्व गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नेतराम यांनी केली आहे.राजीव हे बरेलीच्या नवोदय रुग्णालयात डॉक्टरचे सहाय्यक म्हणून काम करतात. २००९ साली त्यांचा साधनाशी विवाह झाला. त्यांना १४ आणि ८ वर्षे वय असेलली दोन मुले आहेत.

# हिना खानचं गाजावाजा न करता लग्न!

ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेतून अभिनेत्री हिना खान घराघरांत लोकप्रिय झाली. वैयक्तिक आयुष्यात गेल्या काही महिन्यांपासून हिना कॅन्सरशी झुंज देत आहे. तिला तिसऱ्या टप्प्यातील स्तनाच्या कर्करोगाचं ( ब्रेस्ट कॅन्सर ) निदान झालं होतं. या कठीण काळात अभिनेत्रीला कुटुंबीयांसह तिच्या बॉयफ्रेंडने खंबीरपणे साथ दिली.हिना खान व रॉकी जैस्वाल जवळपास ११ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. हे दोघं लग्न केव्हा करणार याची हिनाचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर रॉकीशी गुपचूप लग्न करुन हिनाने तिच्या चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. या दोघांचा लग्नसोहळा नोंदणी पद्धतीने पार पडला. याचे फोटो अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत.आम्हा दोघांचं जग खूपच वेगवेगळं आहे यातून आम्ही प्रेमाचं नवीन विश्व निर्माण केलं. आमच्यातील मतभेद कमी झाले, आमची मनं जुळली आणि आता आम्ही दोघंही आयुष्यभरासाठी बंधनात अडकलो आहोत. आम्हीच एकमेकांचं घर आहोत, आम्हीच आमच्या आयुष्यातील सकारात्मक ऊर्जा आहोत आणि आम्हीच आमची आशा आहोत. आम्ही एकत्र मिळून सगळे अडथळे पार केले आहेत. आज आमचं प्रेम जिंकलं. आता पती आणि पत्नी म्हणून हा नवा प्रवास सुरू करताना तुम्ही आम्हाला तुमचे शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा द्या...” अशी पोस्ट शेअर करत हिनाने भावना व्यक्त केल्या आहेत.दरम्यान, हिना-रॉकी यांच्या प्रेमकहाणीबद्दल सांगायचं झालं तर, हिनाने 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण केलं.

# तुमच्या वडिलांना व्हेंटिलेटर लावलं आहे

अभिनेता प्रसाद लिमये नुकताच 'झी मराठी' वाहिनीवरील 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत झळकला होता. त्यामध्ये त्याने किशोर जहागीरदार ही भूमिका साकारली होती. त्यामधून तो खलनायक म्हणून प्रेक्षकांसमोर आला. त्याच्या या भूमिकेनं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं. मालिकेत त्यानं लीला-एजे यांच्या प्रेमकहाणीमध्ये अनेकदा अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांपूर्वीच या मालिकेनं प्रेक्षकांचा निरोप घेतला. प्रसाद लिमयेनं नुकतीच 'मराठी मनोरंजन विश्व'ला मुलाखत दिली. यावेळी त्यानं त्याचा संघर्षकाळ, वडिलांचा पाठिंबा, अभिनय क्षेत्र असा सगळ प्रवास कथन केला आहे. प्रसादला संघर्षकाळात त्याच्या वडिलांनी खूप पाठिंबा दिल्याचं त्यानं यामधून सांगितलं आहे. परंतु, त्याच्या बाबांचं अकाली निधन झालं आणि त्यानंतर तो बरेच दिवस घरीच असल्याचंही म्हटलं आहे. 'मराठी मनोरंजन विश्व'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये, प्रसाद वडिलांच्या निधनाबद्दल बोलताना म्हणाला, ""देवयानी' मालिकेचा शेवटचा दिवस होता. तेव्हा मी आणि बाबांनी ठरवलं होतं की, रत्नागिरीत आमचं कुलदैवत आहे तिकडे जायचं. तेव्हा बाबा म्हणाले की, तू पुण्याला आलास की, आपण रत्नागिरीला जाऊ."मी म्हटलं, बाबा तुम्ही पुढे व्हा. मी शूट संपलं की, दोन दिवस आराम करतो. कारण- मी सलग काम करतोय. आणि मग सरळ रत्नागिरीलाच येतो. ते म्हणाले ठीक आहे. त्यांच्याकडे पास असल्याने ते ट्रेनने जाणार होते; पण काय झालं कुणास ठाऊक ते त्या दिवशी एसटीनं गेले आणि मला सकाळी ताईचा फोन आला.

# प्रीती झिंटाने घेतला मोठा निर्णय



अभिनेत्री प्रीती झिंटा सध्या आयपीएलमुळे मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. काल मंगळवारी (३ जून) आयपीएल २०२५ ची सांगता झाली. या पर्वाच्या अंतिम सामन्यामध्ये प्रीती झिंटाचा संघ पंजाब किंग्ज व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू प्रतिस्पर्धी होते. परंतु, आरसीबीनं पंजाब किंग्जवर सहा धावांनी मात केली. त्यामुळे प्रीती झिंटाचा संघ कमी धावांच्या फरकामुळे आयपीएलच्या ट्रॉफीला मुकला. या संपूर्ण मोसमात प्रीती झिंटा अनेकदा चर्चेचा विषय ठरली. प्रीती झिंटा फक्त अभिनयापुरती मर्यादित न राहता, ती पंजाब किंग्ज या संघाची मालकीण आहे. एवढंच नव्हे, तर याव्यतिरिक्तसुद्धा ती आणखी एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहे. प्रीती झिंटांनं सांगितलं होतं की, तिनं ३४ मुलींना दत्तक घेतले आहे. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार ती या मुलींच्या शिक्षण, जेवण व कपडे यांचा सर्व खर्च करणार असल्याचं अभिनेत्रीनं सांगितलं होतं. पुढे अभिनेत्री म्हणाली, “त्या आता माझ्या मुली आहेत. माझी जबाबदारी आहेत. मी सातत्यानं त्यांच्या संपर्कात असेन आणि वर्षातून दोनदा त्यांची भेट घेईनप्रीती झिंटाच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं, तर तिनं जीन गुडइनफसह २०१६ साली लॉस एंजेलिसमध्ये लग्न केलं होतं. तिचे पती जीन गुडइनफ आर्थिक विश्लेषक आहेत. प्रीती झिंटा व जीन गुडइनफ या दोघांना दोन मुलं आहेत. एक मुलगी आणि एक मुलगा. २०२१ साली सरोगसीमार्फत दोन मुलांना जन्म दिला.

# 'अफलातून' ते 'एक डाव भुताचा'!

दिग्गज मराठी अभिनेते अशोक सराफ यांना भारत सरकारकडून नुकताच पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशोक सराफ यांचं नाव घेताच डोळ्यांसमोर उभा राहतो एक हसमुख चेहरा, धमाल विनोदी-हरहुन्नरी अभिनेते आणि आता त्यांच्या नावापुढे लागलीय एक खास ओळख 'पद्मश्री अशोक सराफ'. फक्त स्टार होणं सोपं असतं पण, आपल्या चाहत्यांच्या मनात घर करणं हे फक्त अशोक सराफ यांच्यासारख्या महान कलाकारांनाच जमतं. त्यांच्या कलेला अभिवादन करण्यासाठी खास 'अशोक मामा चित्रपट महोत्सव' साजरा करण्यात येत आहे. अल्ट्रा झकास ओटीटीवर 'अशोक मामा चित्रपट महोत्सव' साजरा केला जाईल. अशोक सराफ यांचा जगभरात गाजलेला 'अशी ही बनवाबनवी' चित्रपट तर सगळ्यांना माहितीच आहे, पण यावेळी प्रेक्षकांना अशोक सराफ यांचे अन्य काही निवडक सिनेमे देखील पाहायला मिळणार आहेत.अशोक सराफ यांनी 'अफलातून' (1991) मध्ये गावातून शहरात आलेल्या बजरंगरावांची विनोदी भूमिका साकारली होती. तर त्यांचा 'एक डाव भुताचा' (1982) सिनेमा देखील सर्वत्र लोकप्रिय ठरला होता. 'आपली माणसं', 'वजीर', 'इना मिना डिका', 'सून माझी लाडकी', 'ऐकावं ते नवलच', 'देवघर', 'पैंजण', 'मोस्ट वॉंटेड', 'कोणासाठी कुणीतरी', 'डीड शहाणे', 'या टोपीखाली दडलंय काय?', 'आंधळी कोशिंबीर' असे एकापेक्षा एक गाजलेले सिनेमे अशोक सराफ यांच्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीत महत्त्वाचे ठरले

# बोल्ड सीन करण्याबद्दल श्रियाची प्रतिक्रिया



मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे. अशातच आता लवकरच ती 'छलकपट' सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ओटीटीमध्ये श्रियाने अनेकविध भूमिका साकारल्या आहेत. 'छलकपट' सीरिजनिमित्ताने श्रियाने नुकताच लोकमत फिल्मीशी संवाद साधला. यावेळी तिला सीरिजमधील बोल्ड सीन करताना कोणता विचार करावा लागतो का? याबद्दल आई-वडिलांशी चर्चा होते का? असं विचारण्यात आलं.याचं उत्तर देताना श्रिया म्हणाली, “मला वाटतं ऑफस्क्रीन संस्कार हे ऑनस्क्रीन संस्कारांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत. मला माझ्या ऑफस्क्रीन संस्कारांवर विश्वास आहे. पण एक कलाकार म्हणून मी स्वत:वर मर्यादा घालू शकते असं मला वाटतं नाही किंवा तसं करूही नये. आता काळानुसार एखादी गोष्ट सांगण्याची पद्धत खूप बदलली आहे. आताच्या कामातली मर्यादा आणि सहजता पुर्वीपेक्षा बदलली आहे."यापुढे श्रिया म्हणते, “एखाद्या प्रेमकथेमध्ये मुलगा-मुलगी हे किस करताना दाखवलं जातं. तसे सीन करण्यासाठी मी नाही म्हणणार नाही. पण ते पडद्यावर कसं दाखवलं जाणार आहे? त्या सीनला कसं साकारलं जाणार आहे? त्यामागे नक्की काय भावना आहे? हे महत्त्वाचं आहे. मला स्वत:ला कळतं की, त्यामागचा नेमका अर्थ काय आहे."यापुढे श्रिया म्हणाली, “एखाद्या सीरिजमधील बोल्ड सीनमुळे त्याचं थेट मूल्यमापन करू नये. कारण ती त्या-त्या कथेची गरजही होती. त्यामुळे मला वाटतं की, अशा सीनमागची तुमचा हेतु महत्त्वाचा आहे. यासाठी आई-वडील मला नेहमीच पाठींबा देतात. पण त्यांना माहीत आहे की, मलाही ते निर्णय घेण्याचं स्वतंत्र आहे. पण इंटरनेटवर काहीही होऊ शकतं. फेक व्हिडीओ वगैरे... काहीही होऊ शकतं."मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे.

**भारताला यश** शेवटच्या चेंडूवर कसा बाद झाला इंग्लंडचा सलामीवीर?

# सिराजच्या सापळ्यात क्राऊले अडकला!

## विजयासाठी केवळ ९ विकेट्सची गरज




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांची मालिका आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. ओव्हल कसोटीच्या तिसऱ्या दिवसाखेर भारताने दुसऱ्या डावात दमदार फलंदाजी करत इंग्लंडसमोर ३७४ धावांचं आव्हान उभं केलं आहे. हे लक्ष्य गाठणं इंग्लंडसाठी फारच कठीण ठरणार आहे आणि त्यासाठी त्यांना इतिहास घडवावा लागणार आहे.**

तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस भारताला मोठं यश मिळालं. मोहम्मद सिराजने इंग्लंडचा सलामीवीर झॅक क्राऊलेला त्रिफळाचीत करत इंग्लंडला पहिला मोठा झटका दिला. सिराजने या मालिकेत सातत्याने प्रभावी गोलंदाजी करत भारताच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.ओव्हल कसोटीच्या पहिल्या डावातही सिराजने जबरदस्त कामगिरी करत ४ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या होत्या. त्याच्या अचूक आणि भेदक माऱ्यामुळे इंग्लंडला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. आता दुसऱ्या डावातही त्याने क्राऊलेला बाद करून इंग्लंडच्या अडचणी वाढवल्या आहेत.झॅक क्राऊलेने लॉर्ड्स कसोटीत जसं वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता, तसाच प्रकार अखेरच्या कसोटीतही दिसून आला. सिराज रनअप घेत चेंडू टाकण्यासाठी आला, तेव्हा क्राऊलेने समोरच्या दिशेने हात दाखवत काहीतरी अडचण असल्याचं सांगितलं. जणू काही वेळ वाया जावा आणि पुढचं षटक होऊ नये. हे पाहून क्षेत्ररक्षण करणाऱ्या भारतीय खेळाडूंना हसू आवरलं नाही. मात्र, सिराज शांत राहिला आणि भेदक मारा करत त्या षटकात एकही धाव न देता शेवटच्या चेंडूवर झॅक क्राऊलेला त्रिफळाचीत करत भारताला मोठं यश मिळवून दिलं.सिराज आणि टीम इंडियाने यासाठी आधीच सापळा रचला होता. फिल्डिंग करताना डीप स्क्वेअर लेगला एक क्षेत्ररक्षक उभा करून शॉर्ट बॉल टाकणार असल्याचं भासवलं. पण अचानक सिराजने फुल लेंग्थ चेंडू टाकत मास्टरस्ट्रोक खेळला. चेंडू थेट स्टंप्सवर आदळला आणि क्राऊलेला काही कळण्याआधीच तो बाद झाला. या विकेटमुळे भारताने दिवसाच्या अखेरीस महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवला आणि इंग्लंडच्या अडचणीत भर घातली.मोहम्मद सिराजने झॅक क्राऊलेला टाकलेला चेंडू इतका वेगवान आणि अचूक होता की टप्पा पडताच तो थेट ऑफ स्टम्पवर आदळला. चेंडू इतक्या वेगात होता की पुढे आलेला क्राऊले पूर्णपणे खाली वाकला असूनही तो चेंडू खेळू शकला नाही. बेल्स हवेत उडाल्या आणि इंग्लंडला मोठा धक्का बसला.या विकेटमुळे क्राऊले आणि डकेट यांच्यात झालेली अर्धशतकी भागीदारीही खंडित झाली. तिसऱ्या दिवसाअखेर इंग्लंडचा स्कोअर १ बाद ५० धावा इतका आहे, तर भारताने ३२४ धावांची मोठी आघाडी घेतली आहे. आता भारताला विजयासाठी केवळ ९ विकेट्सची गरज आहे.तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस भारताला मोठं यश मिळालं. मोहम्मद सिराजने इंग्लंडचा सलामीवीर झॅक क्राऊलेला त्रिफळाचीत करत इंग्लंडला पहिला मोठा झटका दिला. सिराजने या मालिकेत सातत्याने प्रभावी गोलंदाजी करत भारताच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.ओव्हल कसोटीच्या पहिल्या डावातही सिराजने जबरदस्त कामगिरी करत ४ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या होत्या. त्याच्या अचूक आणि भेदक माऱ्यामुळे इंग्लंडला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. आता दुसऱ्या डावातही त्याने क्राऊलेला बाद करून इंग्लंडच्या अडचणी वाढवल्या आहेत.झॅक क्राऊलेने लॉर्ड्स कसोटीत जसं वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता, तसाच प्रकार अखेरच्या कसोटीतही दिसून आला. सिराज रनअप घेत चेंडू टाकण्यासाठी आला, तेव्हा क्राऊलेने समोरच्या दिशेने हात दाखवत काहीतरी अडचण असल्याचं सांगितलं. जणू काही वेळ वाया जावा आणि पुढचं षटक होऊ नये.

### इंग्लंडसमोर ३७४ धावांचं आव्हान

मात्र, सिराज शांत राहिला आणि भेदक मारा करत त्या षटकात एकही धाव न देता शेवटच्या चेंडूवर झॅक क्राऊलेला त्रिफळाचीत करत भारताला मोठं यश मिळवून दिलं.सिराज आणि टीम इंडियाने यासाठी आधीच सापळा रचला होता. फिफण अचानक सिराजने फुल लेंग्थ चेंडू टाकत मास्टरस्ट्रोक खेळला. चेंडू थेट स्टंप्सवर आदळला आणि क्राऊलेला काही कळण्याआधीच तो बाद झाला.

# ओव्हल कसोटी जिंकणं मुळीच सोपं नाही!

## इंग्लंडला विजयासाठी 123 वर्षे जुना इतिहास बदलावा लागणार




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड पाचवा कसोटी सामना अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. भारतीय संघाने दुसऱ्या डावात उत्कृष्ट फलंदाजी करत भारताला सर्वात मोठी धावसंख्या उभारून दिली आहे. यशस्वी जैस्वाल आणि आकाशदीपच्या १०७ धावांच्या भागीदारीने या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला आणि सर्वांच्या योगदानाने भारताने पहिल्या डावात ३९६ धावा उभारल्या आहेत.**

भारताने ओव्हल कसोटीत ३९६ धावा केल्या आहेत. यासह इंग्लंडला विजयासाठी ३७४ धावांचं सर्वात मोठं योगदान दिलं आहे.

इंग्लंडला जर पाचव्या कसोटीत विजय मिळवायचा असेल तर १२३ वर्षे जुना विक्रम मोडावा लागणार आहे.ओव्हलच्या मैदानावर आतापर्यंत कधीही ३०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठता आलेलं नाही. या मैदानावर चौथ्या डावात २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य फक्त सहा वेळा गाठण्यात आलं आहे. अखेरच्या वेळेस २०२४ मध्ये श्रीलंकेने ओव्हल कसोटीत इंग्लंडविरुद्ध २१९ धावांचे लक्ष्य गाठले होते. इंग्लिश संघाने १९९४ मध्ये या मैदानावर २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठले होते. त्यांनी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध हा पराक्रम केला होता.ओव्हलवर गाठण्यात आलेलं २६३ हे सर्वोच्च लक्ष्य आहे.

इंग्लंडने १९०२ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ॲशेस मालिकेत हे लक्ष्य यशस्वीपणे गाठलं होतं. त्यावेळेस इंग्लिश संघाने एका विकेटने विजय मिळवला होता. तेव्हापासून ओव्हलच्या मैदानावर २०० पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य फक्त पाच वेळा पार केलं गेलं आहे, परंतु केवळ एकदाच धावसंख्येचा आकडा २५० च्या पलीकडे गेला आहे. १९६३ मध्ये वेस्ट इंडिजने इंग्लंडविरुद्ध २५३ धावांनी विजय मिळवला.

### १२३ वर्षे जुना विक्रम मोडावा


इंग्लंडला विजयासाठी ३७४ धावांचं सर्वात मोठं योगदान दिलं आहे. इंग्लंडला जर पाचव्या कसोटीत विजय मिळवायचा असेल तर १२३ वर्षे जुना विक्रम मोडावा लागणार आहे.ओव्हलच्या मैदानावर आतापर्यंत कधीही ३०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठता आलेलं नाही. या मैदानावर चौथ्या डावात २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य फक्त सहा वेळा गाठण्यात आलं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। रविवार।
। दि. 3 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
**Saswad, Pune - 412301**
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

**Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26**



**Admission Schedule for F.Y.B.Pharm**

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# शिक्षणातून विद्यार्थ्यांना अनुभव मिळणे महत्त्वाचे- डॉ.दीपक शाह!

## शिक्षण विश्व: रोजगार प्रशिक्षण जनजागृती मोहीम कार्यशाळा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिरी चिंचवड : चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज च्या इंटर्नशीप कमिटी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात रोजगार प्रशिक्षण जनजागृती मोहीम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**




त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा बोलत होते. यावेळी व्यासपीठावरती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त सहायक आयुक्त अण्णा बोधडे, संस्थेच्या संचालिका डॉ. तेजल शहा, डिंपल शहा , प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र कांकरिया, डॉ. जयश्री मुळे , डॉ .हर्षिता वाच्छानी , आदी मान्यवर उपस्थितांसमवेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पिंपरी विविध कंपन्याचे मनुष्यबळ विभागाचे उच्च अधिकारी, कार्यकारी महाव्यवस्थापक, विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. त्यांच्या डॉ दीपक शहा, डॉ. तेजल शहा , डॉ . क्षितीजा गांधी , डॉ. राजेंद्र कांकरीया याच्या हस्ते भेटवस्तू देवून यथोचित सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा पुढे म्हणाले, विद्यार्थी शिक्षण घेत असतानाच त्यांच्या क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकाद्वारे मर्यादित कालावधीसाठी, तीन ते सहा महिन्याचा विविध कंपनीत काम प्रशिक्षणातून मिळून प्रत्यक्ष अनुभव मिळावा. त्याना नवीन गोष्टी आत्मसात करता याव्यात. प्रत्यक्ष कामाचे स्वरूप प्रशिक्षण काळात समजावून घेऊन ते कृतीरुपी करता यावे. जेणेकरून त्यांच्या आत्मविश्वास वाढावा. कंपनीत व्यवहार कसे होतात , नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी .या उदात्त हेतूने विविध कंपन्यातील मनुष्यबळ विभागाचे, तज्ञाचे, मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी रोजगार प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना उद्देशून पुढे म्हणाले, तुम्ही शिकावे हीच आमची मनीषा आहे. कष्टाची तयारी ठेवा. विविध क्षेत्रातील तज्ञ, मार्गदर्शक जे मार्गदर्शन करणार आहे. त्यांच्या लाभ घ्यावा .भावी काळात इंटर्नशीप मध्ये ज्यांना रोजगार प्रशिक्षणाची संधी मिळेल , त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे असे आवाहन शेवटी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त सहायक आयुक्त अण्णा बोधडे म्हणाले, अल्पकाळात पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने झाला. औद्योगिक नगरीत शिक्षणाची गरज ओळखून डॉ. दीपक शहा व त्यांच्या प्राध्यापक वर्गांनी अल्पावधीतच दर्जेदार गुणवत्तापूर्वक शिक्षण देत आज सुमारे साडेआठ हजार विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. शहराच्या जडणघडणाची माहिती विद्यार्थ्यांना देत ते पुढे म्हणाले, जग पुढे जात आहे .प्रचंड स्पर्धा आहे .कष्टाशिवाय पर्याय नाही .यशस्वी होण्यासाठी पदवी घेऊन त्या क्षेत्रात प्रत्यक्ष कृतीरूपी काम करता आले तरच स्वतःचे स्थान निर्माण करता येईल. त्यासाठी पदवी पूर्ण करतानाच प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. त्याकडे प्रत्येकाने लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

उपस्थित विविध कंपन्यातील मनुष्यबळ विभागातील उच्च अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले , मुलाखतीच्या वेळी इंग्रजी भाषेचे न्यूनगंड बाळगू नका. इंग्रजी बोलता येत नाही म्हणून खचूनही जाऊ नका . स्वतःवर आत्मविश्वास बाळगा. मुलाखती मध्ये दुसऱ्याच्या विश्वास संपादन करावयाचा असतो ही गोष्ट लक्षात ठेवा. पदवी घेतली म्हणजे झाले असे होत नसून यशस्वी होण्यासाठी शिक्षण शेवटच्या श्वासापर्यंत घ्यावे लागते. मुलाखतीसाठी अर्ज करताना जे लिहिता त्याबद्दल सखोल ज्ञान असणे गरजेचे आहे. बऱ्याचदा मुलाखत घेणारे त्या आधारेच प्रश्न विचारतात. मुलाखतीत बोलताना आत्मविश्वासपूर्वक संभाषण करावे. कामाला लागलाच तर जे काम दिले जाईल, ते अचूकपणे करणे महत्त्वाचे असून वेळेत काम पूर्ण करा. असे सांगून अर्ज कसा करावा, मुलाखत कशी द्यावी याबाबत विविध कंपन्यातील मनुष्यबळ विभागाचे व्यवस्थापक, तज्ञ , राजेंद्र कांबळे, महिंद्र पानशे, जितेंद्र सोनार, शंकर साळुंखे, निलेश माटे, अम्रिता कळंबळेकर, अनुराग तापकीर आदींनी सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे व विविध शंकांचे समर्पकपणे निरसन केले.

कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांचे स्वागत इंटर्नशीप समितीच्या समन्वयीका प्रा. सुवर्णा गोगटे, प्रा. रसिका पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. हर्षिता वाच्छानी यांनी तर आभार प्रा. दिपाली महाजन यांनी मानले .



# माटे हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक, परिवहन समितीची स्थापना

## शिक्षण विश्व: विद्यार्थी सुरक्षिततेला प्राधान्य देऊन समितीची स्थापना

**। पिंपरी चिंचवड ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**व्ही.के. माटे हायस्कूल चिंचवड मध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक समितीची स्थापना करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह, तहयात विश्वस्त,प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर होत्या.**




प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर म्हणाल्या 2025 -26 या शैक्षणिक वर्षापासून मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांची वाहतूक ही मोरया शिक्षण संस्थेने अधिकृतरित्या करार केलेल्या. श्री स्वामी समर्थ एंटरप्राइजेस यांच्यामार्फत पुरवल्या जाणाऱ्या स्कूल बस मधूनच करण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा त्या बसमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे येथून पुढे श्री स्वामी समर्थ एंटरप्राईजेस यांच्या स्कूल बस मधूनच विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये येण्याचे पालकांना व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस यांच्या स्कूलबस मध्ये विद्यार्थी व पालकांसाठी सुरक्षितता देण्यासाठी जीपीएस यंत्रणा, टॅपिंग प्रेझेंटी, लाईव्ह लोकेशन अधिकृत वाहन चालक व मावशी व वेळेवर विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचे व घरी सोडण्याचे नियोजन , प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बसण्याची जागा या सर्व सुविधा देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस चे संचालक श्री. नवले यांनी श्री स्वामी समर्थ इंटरपाईजेस यांच्यामार्फत या सर्व सुविधा देण्याचे आश्वासन दिले .मोरया शिक्षण संस्थेने नाकारलेल्या ,परवानगी न दिलेल्या किंवा संस्थेशी करार नसणाऱ्या स्कूल बस आणि व्हॅन मधून विद्यार्थ्यांना पालकांनी पाठवू नये असे आवाहन मोरया शिक्षण संस्थेचे , परिवहन समितीचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले. परिवहन समितीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे गठित करण्यात आली. अध्यक्ष स्वप्निल शेडगे उपाध्यक्ष इंद्रायणी माटे-पिसोळकर ,लोकप्रतिनिधी शितल शिंदे, सचिव हनुमंत हुचगोळ ,समिती सदस्य रणजीत सावंत, दिलीप साळुंके, विलास पाटील, चित्रा आपटे, पूजा पिसाळ, छाया कुलकर्णी वाहतूक कंत्राटदार महेश नवले ,वाहतूक विभाग चिंचवड शंकर ढामसे मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांची एकत्रित परिवहन समिती गठीत करण्यात आली. सूत्रसंचालन हनुमंत हुचगोळ यांनी केले तर आभार विलास पाटील यांनी मानले.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org